साप्ताहिक

# हॅलो न्यूज

e-mail-hellonewskrd@gmail.com

HELLO NEWS

संपादक : विशाल वामन पाटील

* सातारा * वर्ष १ * अंक ८ * मराठी * सोमवार २० जुलै ते २६ जुलै २०२६ * PRGI. MHMAR/26/A3624 * पाने ४ * किंमत ३ रुपये

* Satara * Year 1 * Volume 8 * Marathi * Monday 20 Jully to 26 Jully 2026 * PRGI. MHMAR/26/A3624 * Page 4 * Price 3 Rs.

## सोनम वांगचुक बळजबरीने रुग्णालयात

### दिल्ली पोलिसांची कारवाई, विरोधकांचा सरकारवर हल्लाबोल, दीपके यांनी सुरू केले उपोषण

**नवी दिल्ली, वृत्तसंस्था**

नीट पेपरफुटीप्रकरणी केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्यासाठी येथील जंतरमंतरवर बेमुदत उपोषणाला बसलेले सामाजिक कार्यकर्ते सोनम वांगचुक यांना २१ व्या दिवशी शनिवारी दिल्ली पोलिसांनी बळजबरीने सफदरजंग रुग्णालयात हलवले. या कारवाईचा विरोधी तीव्र निषेध केला असून ही सरकारची दडपशाही असल्याचा आरोप विरोधकांनी केला आहे.

आंदोलनाची जागा सोडण्याचे पोलिसांचे आवाहन कॉकरोच जनता पार्टी ने फेटाळून लावले असून अभिजित दीपके यांनी बेमुदत उपोषण सुरू केले आहे. वांगचुक यांनी आपले उपोषण सोडलेले नाही आणि ते रुग्णालयातूनच ते सुरू ठेवतील, असेही पार्टीतर्फे जाहीर करण्यात आले.

शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या हकालपट्टीची मागणी करणाऱ्या या संघटनेने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या राजीनाम्याची



मागणी केली असून, २० जुलै रोजी संसदेवरील मोर्चा काढण्यावर ते ठाम आहेत.

रुग्णालयाच्या अधिकाऱ्यांनी दुपारी ३.३० वाजता जारी केलेल्या बुलेटिनमध्ये म्हटले की, वांगचुक यांच्या शरीरातील पाण्याचे प्रमाण कमी झाले असून चयापचयाशी संबंधित प्रकृती बिघाडाची लक्षणे दिसत आहेत, तरीही त्यांनी सलाईन, ओआरएस आणि इतर औषधे घेण्यास नकार दिला आहे. वांगचुक यांच्या प्रकृतीवर सतत लक्ष ठेवले जात असून, त्यांच्या आरोग्याच्या हितासाठी उपचार घेण्याबाबत त्यांचे समुपदेशन केले जात आहे, असेही रुग्णालयाने सांगितले.

दरम्यान, दिपके यांनी पोलिसांवर गंभीर आरोप केले. मला दिल्ली पोलिसांनी मारहाण केली आणि ताब्यात घेतले. एका मित्राच्या घरी फ्रेश होण्यासाठी गेलो असताना पोलिसांनी आपल्याला मारहाण केली व काही काळ ताब्यात ठेवले असा आरोप दिपके यांनी केला.

## घनकचरा प्रकल्पावरून पालिकेत खळबळ

### विजय वाटेगावकर यांचे सत्ताधाऱ्यांवर आरोप; कारवाईची मागणी

**कराड (हॅलो न्यूज)**

कराड नगरपालिकेच्या घनकचरा प्रक्रिया प्रकल्पासह विविध विकासकामांमध्ये गंभीर अनियमितता झाल्याचा आरोप भाजप गटनेते व नगरसेवक विजय वाटेगावकर यांनी केला. घनकचरा प्रकल्प परिसरातील बगिचा, अंतर्गत रस्ते आणि सुशोभीकरणाची कामे कागदोपत्री पूर्ण दाखविण्यात आली असली, तरी प्रत्यक्ष पाहणीत ती दिसून येत नसल्याचा दावा करत त्यांनी बुधवारी पत्रकार परिषदेत प्रशासनाकडे सविस्तर चौकशीची मागणी केली.



याप्रसंगी पालिकेच्या मुख्याधिकाऱ्यांना या संदर्भात तीन स्वतंत्र निवेदने सादर करण्यात आल्याची माहिती वाटेगावकर यांनी दिली. यावेळी नगरसेवक सुहास जगताप, शिवाजी पवार, सुमित शिंदे, अजय पावसकर, आशुतोष डुबल, किशोरी शिंदे, वैष्णवी वायदंडे, शारदा माने आणि वर्षा वास्के उपस्थित होते.

वाटेगावकर म्हणाले, घनकचरा प्रकल्पांतर्गत काही अंतर्गत रस्त्यांना ठरावाद्वारे मंजुरी देण्यात आली होती. त्यानंतर निविदा प्रक्रियाही पूर्ण झाल्याची नोंद आहे. मात्र प्रकल्प परिसरात संबंधित रस्ते किंवा बगिच्यातील मार्ग प्रत्यक्षात अस्तित्वात नसल्याचे दिसून येते. त्यामुळे संबंधित ठराव, मंजुरी प्रक्रिया आणि खर्चाची पडताळणी करून संपूर्ण माहिती नागरिकांसमोर जाहीर करावी, अशी मागणी त्यांनी केली.

नगरपालिकेच्या विकासकामांमध्ये पूर्ण पारदर्शकता राखावी, संबंधित ठरावांची पडताळणी करून दोषींवर कठोर कारवाई करावी आणि नागरिकांसमोर वस्तुस्थिती मांडावी, अशी मागणी करत वाटेगावकर यांनी जनहितासाठी तीव्र आंदोलन उभारण्याचा इशारा दिला.

## जयवंतराव भोसले पतसंस्थेचे कार्यक्षेत्र आता महाराष्ट्रभर

### साताऱ्यासह पुणे, सांगली व कोल्हापूर जिल्ह्यात १० नवीन शाखांना मंजुरी

**कराड (हॅलो न्यूज)**

येथील सहकारमहर्षी मा. जयवंतराव भोसले (आप्पा) नागरी सहकारी पतसंस्थेला आता संपूर्ण महाराष्ट्र राज्यात आपला कार्यविस्तार करण्यास सहकार खात्याकडून मंजुरी मिळाली आहे. तसेच साताऱ्यासह पुणे, सांगली व कोल्हापूर जिल्ह्यात नवीन १० शाखा सुरू करण्यासही मंजुरी मिळाल्याने, पतसंस्थेच्या विस्ताराला नवे बळ प्राप्त झाले आहे.

सर्वसामान्य नागरिकांसह छोटे व्यापारी, उद्योजक आणि व्यावसायिकांना आर्थिक पाठबळ मिळवून देण्याच्या उद्देशाने २४ एप्रिल २००१ रोजी आमदार डॉ. अतुलबाबा भोसले यांनी कराडमध्ये सहकारमहर्षी मा. जयवंतराव भोसले (आप्पा) नागरी सहकारी पतसंस्थेची स्थापना केली. सुरवातीच्या काळात सातारा जिल्हा कार्यक्षेत्र असलेल्या या पतसंस्थेने सांगली जिल्ह्यातही सुमारे ३० शाखांच्या



माध्यमातून आपला कार्यविस्तार केला. संस्थेने नुकतेच आपले रौप्यमहोत्सवी वर्ष साजरे केले असून, गेल्या २५ वर्षांत दर्जेदार व विश्वासार्ह बँकिंग सेवा देत, सातत्याने ऑडिट वर्ग अ प्राप्त केला आहे.

आपल्या सक्षम व्यवस्थापनामुळे आणि काटेकोर आर्थिक शिस्तीमुळे या पतसंस्थेने ग्राहकांचा विश्वास संपादन केला असून, सहकार खात्याने या पतसंस्थेचे कार्यक्षेत्र संपूर्ण महाराष्ट्रभर विस्तारण्यास मंजुरी दिली आहे. याबाबतचा आदेश सहकारी संस्थांचे अपर निबंधक मिलिंद भालेराव यांनी शुक्रवारी (ता. १७) पारित केला. तसेच पतसंस्थेला नवीन १० शाखा सुरू करण्यासही मंजुरी देण्यात आली आहे. त्यामुळे लवकरच सातारा जिल्ह्यात लोणंद व शिरवळ येथे, पुणे जिल्ह्यात वाकड येथे, कोल्हापूर जिल्ह्यात पेठवडगाव येथे; तर सांगली जिल्ह्यात विटा, शिराळा, तासगाव, कुंडल, आष्टा व चिंचणी येथे पतसंस्थेच्या नवीन शाखा सुरु केल्या जाणार आहेत.

या नवीन शाखांमुळे ग्रामीण तसेच शहरी भागातील नागरिक, शेतकरी, व्यापारी, उद्योजक, महिला बचत गट, नोकरदार वर्ग आणि लघुउद्योजकांना संस्थेच्या विविध आर्थिक सेवा सहज उपलब्ध होणार आहेत. तसेच ठेवी, कर्ज सुविधा, बचत योजना तसेच इतर वित्तीय सेवांचा लाभ आता अधिक व्यापक स्तरावर मिळणार असल्याचे पतसंस्थेचे संस्थापक आमदार डॉ. अतुलबाबा भोसले यांनी सांगितले.

## जागर... अंधश्रध्देची नव्हे श्रध्देची पांडुरंगाची वारी

**विशाल वामन पाटील**
**(हॅलो न्यूज)**

देव, धर्म यांचा विषय जेथे येतो तेथे श्रध्दा अन् अंधश्रध्दा याविषयी चर्चा होत असतेच. श्रध्देची व्याख्या आणि अंधश्रध्देची परिभाषा ज्यांनी समजून घेतली तो पांडुरंगाची वारी केल्याशिवाय राहणार नाही. श्रध्दा ही निस्सिम भक्तीचे रूप तर अंधश्रध्दा ही भक्ती नव्हे शक्तीसाठी धारण केलेलं रूप म्हणावं लागेल. तेव्हा अंधश्रध्देच्या दुनियेत देव, धर्म जात असताना या जगाच्या पाठीवर केवळ महाराष्ट्रातील पंढरपूरच्या विठ्ठलाची वारी ही श्रध्देची वारी असल्याचे अनेक विचारवंत सांगतात. कारण या वारीत कुठेच अंधश्रध्दा दिसत नाही केवळ पांडुरंगाची, विठ्ठलाची वारी



आत्मिक समाधानासाठी निघालेली असते, अशी ही श्रध्देची वारी असते.

विठ्ठल भेटीसाठी महाराष्ट्रासह परराज्यातून वारकरी येत असतात. पांडुरंगाची भेट घेण्यासाठी पायी चालत वारी निघते. या वारीत केवळ विठ्ठलनाम घेतले जाते. इथे कोणातीही द्वेष, राग नसतोच परंतु कोणी मोठा, छोटा असा भेदभावही नसतो. संपूर्ण वारीत कोणतंही मागण, कोणताही नवस नसतो. इथे केवळ श्रध्देने, विठ्ठल भक्तीने भेटीची ओढ असते. अंधश्रध्देचा साधा लवलेशही दिसत नाही. विठ्ठल चमत्कार करेल, विठ्ठल मोठ करेल, छोट करेल. विठ्ठल जादूटोणा करेल, विठ्ठल जादू करेल असा कोणताच विचार वारकऱ्यांच्या मनाला शिवत नाही. इथे केवळ श्रध्देने पांडुरंगाची वारी करायची अन् आत्मिक समाधान मिळवायचं हा एकच विचार लाखो वारकऱ्यांच्या मनी असतो.

विठ्ठल आणि वारकरी यांच्या भक्तीचे नात सोडल्यास सर्वच देव, धर्मात श्रध्दा, अंधश्रध्देचा खेळ पहायला मिळत आला आहे. कोणातरी देव मला पावेल, त्यासाठी मी नवस बोलला पाहिजे. तो नवस फेडला पाहिजे. त्यासाठी काहीतरी दान केले पाहिजे. यामध्ये प्राण्यांचा बळी दिला पाहिजे. (उदा. बकरे, कोबडा यासह जिवंत पक्षी, प्राणी) तर काही ठिकाणी वस्तू किंवा पैशाच्या स्वरूपात दान केले पाहिजे. अन्यथा अमुक एका पुजाऱ्याला, ब्राम्हणाला किंवा विशिष्ट प्रकारच्या जोडप्याला अन्नदान, वस्त्रदान केले पाहिजे. तसेच व्रतवैतल्य केले पाहिजे. तरच देव पावतो, अशा कथा ऐकल्या जातात, त्याप्रमाणे करावेच लागते. परंतु, विठ्ठल भक्ताला अशा कोणत्याच बंधानात बांधले जात नसल्याने विठ्ठल भक्त अंधश्रध्देने नव्हे श्रध्देने वारी अन् भक्ती करत असतो. तेव्हा श्रध्देची वारी जीवनात प्रत्येकाने एकदा केलीच पाहिजे.

(जागर..)

संपादकीय

# याची देही, याची डोळा...

आषाढी वारी म्हणजे केवळ पायी चालण्याचा प्रवास नव्हे, तर श्रद्धा, समर्पण आणि सामूहिक संस्कारांचा अखंड उत्सव आहे. या वारीतील सर्वाधिक भावस्पर्शी आणि आध्यात्मिक क्षण म्हणजे रिंगण सोहळा. माऊलींचा अश्व रिंगणात धावताच लाखो वारकऱ्यांच्या मुखातून एकच जयघोष उमटतो ''ज्ञानोबा-तुकाराम!'' त्या क्षणी प्रत्येक वारकरी आपल्या डोळ्यांनी भक्तीचा जिवंत अनुभव घेत असतो. म्हणूनच हा अनुभव ''याची देही, याची डोळा'' असा अविस्मरणीय ठरतो.

रिंगण ही केवळ धार्मिक परंपरा नाही, तर श्रद्धेचे जिवंत प्रतीक आहे. अश्वाच्या टापांनी उडालेली मातीही वारकरी प्रसाद मानून मस्तकी लावतात. कारण त्या मातीत संतांच्या चरणस्पर्शाची भावना दडलेली असते. विज्ञानाच्या कसोट्यांवर या भावना मोजता येत नसल्या, तरी त्या वारकऱ्यांच्या जीवनाला सकारात्मक दिशा देतात. या श्रद्धेतूनच संयम, समानता, सेवा आणि बंधुभावाची शिकवण समाजाला मिळते.

आजच्या धावपळीच्या, तणावपूर्ण आणि स्पर्धात्मक जीवनात रिंगणाचा संदेश अधिक महत्त्वाचा वाटतो. लाखो लोक एकत्र येऊन शिस्त, स्वच्छता आणि परस्पर सहकार्याचे दर्शन घडवतात. कोणताही भेदभाव न करता सर्वजण एकाच नामघोषात सहभागी होतात. हीच खरी सामाजिक एकात्मतेची ताकद आहे.

रिंगण पाहून वारकऱ्यांच्या चेहऱ्यावर उमटणारे समाधान हे कोणत्याही भौतिक सुखापेक्षा मोठे असते. ते समाधान भक्तीचे, विश्वासाचे आणि आत्मिक शांततेचे असते. म्हणूनच वारीचा हा सोहळा महाराष्ट्राच्या सांस्कृतिक परंपरेचे जतन करणारा आणि भावी पिढ्यांना माणुसकीचा संदेश देणारा अमूल्य ठेवा आहे. ''याची देही, याची डोळा'' अनुभवलेला हा आनंद शब्दांत मावणारा नसून, तो प्रत्यक्ष अनुभवल्यानंतरच मनाला खऱ्या अर्थाने स्पर्श करून जातो.

''याची देही याची डोळां ।
नाही त्रिभुवनी ऐसा सोहळा ।।''



# सहा-सात वर्षांनंतर तिला मिळाले नवजीवन!

## कराडमध्ये जटा निर्मूलनाचा प्रेरणादायी उपक्रम; वैज्ञानिक दृष्टिकोनाचा जागर

**कराड (हॅलो न्यूज)**

अंधश्रद्धा, भीती आणि गैरसमजांच्या जोखडात अडकलेल्या कराड तालुक्यातील विद्यानगर (सैदापूर) परिसरातील ४५ वर्षीय महिलेची सहा-सात वर्षांपासूनची जटा अखेर सोडविण्यात आली. अनेक वर्षे जटांमुळे शारीरिक वेदना, मानसिक तणाव आणि सामाजिक उपेक्षा सहन करणाऱ्या या महिलेला जटामुक्त करून नव्या आयुष्याची वाट खुली करण्यात आली. जटा निर्मूलन चळवळीचे कार्यकर्ते डॉ. सुधीर कुंभार यांच्या मार्गदर्शनाखाली हा सामाजिक उपक्रम पार पडला.

दहावीपर्यंत शिक्षण घेतलेल्या या महिलेच्या जटांमुळे डोक्यात वेदना, अस्वच्छता आणि मानसिक तणाव वाढत होता. गेल्या महिन्यात विद्यानगर येथील स्वाती जाधव आणि तानाजी विठ्ठले यांनी महिलेचे समुपदेशन केले. त्यानंतर डॉ. सुधीर कुंभार यांच्या नेतृत्वाखाली अलकेश ओहळ आणि शिवाजी बोत्रे यांनी अत्यंत संयमाने व कौशल्याने तिची जटा सोडवली. जटा सोडवल्यानंतर महिलेच्या चेहऱ्यावरचा आनंद आणि दिलासा स्पष्टपणे दिसून आला.

यावेळी एसजीएम कॉलेजच्या राष्ट्रीय सेवा योजना (एन.एस.एस.)च्या २० विद्यार्थ्यांना जटा निर्मूलनाची प्रक्रिया, त्यामागील वैज्ञानिक कारणे आणि समाजातील अंधश्रद्धांचे परिणाम याविषयी सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. या उपक्रमात एम. एन. रॉय संस्था, अंधश्रद्धा निर्मूलन समिती (अंनिस) आणि एन्व्हायरो क्लबच्या सदस्यांनी सक्रिय सहभाग नोंदवला.

# कृषी कर्जमाफीबद्दल शेतकऱ्यांकडून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा मुंबईत भव्य सत्कार

## प्रदेशाध्यक्ष रामकृष्ण वेताळ यांच्या वतीने कार्यक्रमाचे आयोजन

**कराड (हॅलो न्यूज)**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कृषी कर्जमाफी योजनेच्या घोषणेच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या वतीने मुख्यमंत्री ना.देवेंद्र फडणवीस यांचा भव्य सत्कार सोहळा मुंबई येथील यशवंतराव चव्हाण सेंटरमध्ये उत्साहात पार पडला. भारतीय जनता पक्ष किसान मोर्चा, महाराष्ट्र प्रदेशच्या वतीने आयोजित करण्यात आला.

कार्यक्रमाला भाजपा प्रदेशाध्यक्ष आ. रवींद्र चव्हाण, मंत्री दत्तात्रय भरणे,मंत्री अशोक उईके, भाजपा किसान मोर्चाचे राष्ट्रीय सरचिटणीस डॉ. अनिल बोंडे, भाजपा महिला प्रदेशाध्यक्ष चित्राताई वाघ,भाजपा किसान मोर्चाचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष रामकृष्ण वेताळ यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

नुकत्याच पार पडलेल्या पावसाळी अधिवेशनात राज्य सरकारने शेतकऱ्यांसाठी सुमारे ४० हजार कोटी रुपयांच्या कृषी कर्जमाफीची घोषणा केल्याबद्दल हा सत्कार आयोजित करण्यात आला. सत्काराला उत्तर देताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, हा सत्कार मी वैयक्तिक स्वरूपात नव्हे, तर संपूर्ण मंत्रिमंडळाच्या वतीने स्वीकारत असून, या निमित्ताने राज्यातील शेतकऱ्यांशी थेट संवाद साधण्याची संधी मिळाली आहे.

यावेळी त्यांनी शेतकरी हिताच्या विविध निर्णयांची माहिती दिली. साडेसात अश्वशक्तीपर्यंतच्या कृषी पंपांना मोफत वीजपुरवठ्याची योजना यापुढेही कायम ठेवण्यात येणार असून, यापूर्वीची सुमारे ४८ हजार कोटी रुपयांची थकीत वीजबिले माफ करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

तसेच नवीन वीजजोडणी मिळविताना शेतकऱ्यांना कोणतीही अडचण येणार नाही, याची शासनाकडून काळजी घेतली जाईल. भविष्यात शेतकऱ्यांना दिवसा बारा तास शेतीसाठी वीज उपलब्ध करून देण्याच्या दिशेने सरकार कार्यरत असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

कार्यक्रमात मंत्री दत्तात्रय भरणे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना भविष्यात देशाचे नेतृत्व करण्याची संधी मिळावी, अशी भावना व्यक्त केली. मुख्यमंत्री यांनी शेतकरी हितासाठी जाहीर केलेल्या विविध निर्णयांचे उपस्थित शेतकऱ्यांनी जोरदार स्वागत करत टाळ्यांच्या गजरात त्यांचा सत्कार केला.

यावेळी भाजपा किसान मोर्चाचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष रामकृष्ण वेताळ यांनी सांगितले की, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली किसान मोर्चा राज्यातील शेतकऱ्यांपर्यंत शासनाच्या विविध योजना प्रभावीपणे पोहोचविण्यासाठी सातत्याने कार्यरत राहील. शेतकऱ्यांचे हित हेच आमचे सर्वोच्च कर्तव्य असून, त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी भविष्यातही कटिबद्धपणे काम करत राहू, अशी ग्वाही त्यांनी दिली. या कार्यक्रमासाठी संपूर्ण महाराष्ट्रातील शेतकरी मुंबईत उपस्थित होते याचबरोबर किसान मोर्चाचे पदाधिकारी या कार्यक्रमासाठी उपस्थित होते अतिशय दिमागदार पद्धतीने हा सोहळा पार पडला.




**कृषी कर्जमाफी शेतकऱ्यांसाठी नवसंजीवनी**

महाराष्ट्रातील शेतकरी अनेक अडचणींचा सामना करीत आहेत. या अडचणीमुळे त्याची आर्थिक अवस्था दुर्बल झाली होती. दोन लाखापर्यंतची कर्जमाफी मिळाल्यामुळे त्याला आर्थिक दिलासा मिळणार असून नवीन उमेदीने तो पुढील शेती हंगाम सुरू करणार आहे. त्यामुळे ही कर्जमाफी त्याच्यासाठी नवसंजीवनी ठरणार आहे.

**– रामकृष्ण वेताळ, प्रदेशाध्यक्ष भाजपा किसान मोर्चा**

# मलकापूरातील अल्पवयीन मुलीच्या छेडछाड प्रकरणाने संताप

## कराड शहर पोलीस ठाण्यावर नागरिकांचे ठिय्या आंदोलन : आरोपीवर कठोर कलमे लावून कडक शिक्षेची मागणी

**कराड (हॅलो न्यूज)**

मलकापूर येथे चार दिवसांपूर्वी अल्पवयीन मुलीची छेडछाड करून तिच्या वडिलांना मारहाण करण्यात आल्याच्या घटनेनंतर परिसरातील नागरिकांमध्ये तीव्र संतापाची लाट उसळली आहे. या घटनेच्या निषेधार्थ आज मलकापूरमधील संतप्त नागरिक, पालक, महिला आणि विविध सामाजिक घटकांनी कराड शहर पोलीस ठाण्यावर मोर्चा काढत ठिय्या आंदोलन केले.

यावेळी आंदोलकांनी पोलिस प्रशासन व संबंधित शाळेविरोधात तीव्र नाराजी व्यक्त करत मलकापूर परिसरात वाढत चाललेल्या गुन्हेगारीवर तातडीने आळा घालण्याची मागणी केली. महिलांवरील अत्याचार, छेडछाड आणि मारहाणीच्या घटनांमुळे नागरिकांमध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण झाली असून, अशा प्रवृत्तींना वेळीच आळा घालण्यासाठी पोलिसांनी कठोर आणि प्रभावी कारवाई करावी, अशी मागणी आंदोलकांनी केली.

सदर प्रकरणातील अटक करण्यात आलेल्या आरोपीवर कठोर कायदेशीर कलमे लागू करून त्याला जास्तीत जास्त शिक्षा व्हावी, अशी मागणीही पालक आणि नागरिकांनी केली. अशा घटनांमुळे समाजात चुकीचा संदेश जात असून, भविष्यात अशा प्रकारांना प्रतिबंध घालण्यासाठी कायद्याचा धाक निर्माण होणे आवश्यक असल्याचे आंदोलकांनी नमूद केले. आंदोलनादरम्यान नागरिकांच्या वतीने प्रभारी डीवायएसपी सुदाम पाचोरकर व कराड शहर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक दत्तात्रय दराडे यांना निवेदन देण्यात आले. त्यानंतर बोलताना पोलिसांनी मलकापूर परिसरातील कायदा व सुव्यवस्था अधिक बळकट करणे, नियमित पोलीस गस्त वाढविणे, महिलांच्या सुरक्षेसाठी विशेष उपाययोजना राबविणे आणि संबंधित प्रकरणात कठोर कायदेशीर कारवाई करण्याचे आश्वासन पाटणचे डीवायएसपी सुदाम पाचोरकर व वरिष्ठ पोलीस निरीक्षक दत्तात्रय दराडे यांनी जमलेल्या पालकांना दिले.



# लोणंद येथे संवाद वारी प्रदर्शनास वारकऱ्यांचा प्रतिसाद

**सातारा, जिमाका**

श्री संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्यासोबत पालखी मुक्कामाच्या ठिकाणी माहिती व जनसंपर्क महासंचालनालय मार्फत संवाद वारी या शासनाच्या विविध लोककल्याणकारी योजनांची, उपक्रमांची माहिती देणाऱ्या चित्र प्रदर्शनाचे, एलईडी व्हॅन, कलापथक व्हॅन तसेच चित्ररथाचे आयोजन करण्यात आले आहे.

लोणंद येथे या उपक्रमाचे सांगोला येथून आलेल्या वारकरी दिंडीचे प्रमुख बिरा बंडगर महाराज यांच्याहस्ते करण्यात आले. यावेळी माहिती उपसंचालक किरण मोघे, जिल्हा माहिती अधिकारी वर्षा पाटोळे यांच्यासह विविध विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

* Satara * Vol- 8 * Isshu- 1 * Marathi * Weklly * Page- 4 * Prise Rs- 3/- * PRGI. MHMAR/26/A3624

साप्ताहिक हॅलो न्यूज (PRGI. MHMAR/26/A3624) हे मराठी पत्रक मालक, प्रकाशक, संपादक विशाल वामन पाटील यांनी मुद्रक सचिन काशिनाथ पाटील यांच्या राजमुद्रा ऑफसेट, २३३, सूर्या कॉम्प्लेक्स कराड, जि. सातारा येथे छापून (मुद्रीत) साप्ताहिक हॅलो न्यूज मुख्य कार्यालय २०६/१, वार्ड नं- ४, मु. पो तांबवे, ता. कराड, जि. सातारा ४१५११४ येथून प्रकाशित केला. (या वृत्तपत्रातील प्रकाशित झालेल्या जाहीरातीसंदर्भात त्या त्या कार्यालयाशी / संस्थेची व्यक्तीशः संपर्क साधुन खात्री करुन पुढील व्यवहार करावा. वृत्तपत्रात प्रसिद्ध झालेल्या लेख, वृत्त किंवा इतर मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (काही वाद निर्माण झाल्यास कराड न्यायालया अंतर्गत)

Weekly Hello News publisher, Owner and Editor By Vishal Vaman patil has Printed Sachin kashinath Patil, Rajmudra offset, 233, Surya complex karad, Dist - Satara At published weekly Hello News Head office 206/1 ward no -4, At - Post Tambave, Tal - karad, Dist - Satara 415114

# कराडच्या यशवंत हायस्कूल मध्ये नीट पेपरफुटीवर थेट जन्मठेपेची मागणी

## एकदिवसीय चर्चासत्रात विद्यार्थ्यांनी केला थेट प्रहार

**कराड (हॅलो न्यूज)**

येथील रयत शिक्षण संस्थेच्या यशवंत हायस्कूल मध्ये नुकतेच इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी शिक्षण क्षेत्राच्या वाढत्या चिंता आणि आव्हाने या अत्यंत संवेदनशील विषयावर एक दिवसीय चर्चासत्र पार पडले. या चर्चासत्रात विद्यार्थ्यांनी केवळ पुस्तकी ज्ञानापुरते मर्यादित न राहता सद्यस्थितीतील शैक्षणिक समस्यांवर अत्यंत निर्भीडपणे आणि प्रगल्भतेने आपली मते मांडली. विशेषतः सध्याचा ज्वलंत विषय असलेल्या पेपरफुटीवर विद्यार्थ्यांनी केलेले सखोल विश्लेषण आणि सुचवलेल्या उपाययोजना ऐकून उपस्थित शिक्षक आणि मान्यवर अचंबित झाले.

या चर्चासत्रात विशेषतः अलीकडच्या काळात नीट पेपरफुटीमुळे १६ निष्पाप विद्यार्थ्यांनी केलेल्या आत्महत्या या विषयावर बोलताना एका विद्यार्थ्याने केवळ आकडेवारी न सांगता, ङ्गङ्गत्या मृत्यूनंतर कुटुंबावर झालेला आघात आणि त्यांच्या घरातील दुःख काय असेल?फफ अशा संवेदनशील शब्दांत मांडणी केली. पेपरफुटीमध्ये सापडणारे रॅकेट, छुप्या पद्धतीने मदत करणारे केंद्रचालक किंवा अधिकारी यांच्यावर केवळ तात्पुरती निलंबनाची कारवाई न करता, त्यांना अजामीनपात्र गुन्ह्यांतर्गत थेट जन्मठेपेची किंवा कठोर कारावासाची शिक्षा झाली पाहिजे, अशी आग्रही मागणी विद्यार्थ्यांनी



केली. तसेच अशा गुन्हेगारांच्या संपत्तीवर टाच आणून त्यांच्यावर आर्थिक दंडाची मोठी कारवाई करावी, जेणेकरून भविष्यात असा गुन्हा करण्याचे धाडस कोणी करणार नाही.

परीक्षा घेणाऱ्या सरकारी यंत्रणांमध्ये (उदा. परीक्षा मंडळे) आमूलाग्र बदल करून तिथे प्रामाणिक अधिकाऱ्यांची नियुक्ती करावी. सरकारने अशा घटना घडल्यावर सारवासारव न करता, तत्परतेने उच्चस्तरीय आणि निष्पक्ष चौकशी करून अहवाल जाहीर करावा, जेणेकरून विद्यार्थ्यांचा यंत्रणेवरील विश्वास कायम राहील.

रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिलचे सदस्य अॅड.रविंद्र केशवराव पवार यांनी विद्यार्थ्यांच्या धाडसाचे कौतुक केले.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाचे मुख्याध्यापक व्ही.यु.पाटील होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पी.एस.पाटील यांनी केले तर आभार एम.एम.घारगे यांनी मांडले. सदर कार्यक्रमास सद्गुरू गाडगे महाराज कॉलेज कराडचे मान्यवर, विद्यालयातील शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते.



# वसंतगड विद्यालयात एम.पी.एस.सी स्पर्धा परीक्षेत यशस्वी विद्यार्थ्यांचा सत्कार

**कराड (हॅलो न्यूज)**

वसंतगड येथील श्री चंद्रसेन शिक्षण संस्थेच्या श्री. वि. ग. माने हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज वसंतगड मध्ये महाराष्ट्र लोकसेवा आयोग (एमपीएससी )स्पर्धा परीक्षेत उज्वल यश मिळावलेल्या विद्यालयाच्या माजी विद्यार्थ्यांचा संस्थेच्या व विद्यालयाच्या वतीने सत्कार करण्यात आला.

विद्यालयाचे माजी विद्यार्थी रोहित लक्ष्मण पांगरे याची एमपीएससीतून उपअभियंता (यांत्रिकी) गट-अ या पदावर तर माजी विद्यार्थिनी तेजस्विनी सागर हुलवान (मेटकरी) हिची संचालनालय वैद्यकीय शिक्षण व संशोधन मुंबई (डीएमईआर) या विभागात समाजसेवा अधीक्षक म्हणून नेमणूक झाली आहे. तसेच विद्यालयाचे माजी विद्यार्थी सुहास यादव याची भारतीय सैन्य दलात तर संतोष भानुदास वाघमारे यांची पुणे महानगरपालिका येथे सहाय्यक अतिक्रमण निरीक्षक म्हणून निवड झाली आहे.

विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल संस्थेचे सचिव रघुनाथ नलवडे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाचे माजी मुख्याध्यापक एच. डी. पाटील होते. यावेळी उपाध्यक्ष महिपती कोकरे, हणमंतराव नलवडे, वसंतगडचे सरपंच अॅड. अमित नलवडे, चंद्रकांत पाटील, तानाजीराव वाघमारे, पर्यवेक्षक शिवाजी पाटील यांच्यासह शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी, पालक, ग्रामस्थ व विद्यार्थी उपस्थित होते. सूत्रसंचालन क्रीडाशिक्षक अनिल काटकर यांनी केले. आभार विवेकचंद्र ढवळे यांनी मानले.

# कृष्णा कॉलेज ऑफ फार्मसीला एक्सलंट ही सर्वोच्च श्रेणी प्राप्त

**कराड (हॅलो न्यूज)**

महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाने शैक्षणिक वर्ष २०२५-२६ सालात केलेल्या संस्था सर्व्हेक्षण अहवालात कृष्णा चॅरिटेबल ट्रस्ट संचलित कृष्णा कॉलेज ऑफ फार्मसीमधील डी. फार्म अभ्यासक्रमाला एक्सलंट हा सर्वोच्च शैक्षणिक दर्जा प्रदान केला आहे. महाविद्यालयाने सलग ५ वर्षे हा सर्वोच्च दर्जा कायम राखत, गुणवत्तापूर्ण शिक्षणाची परंपरा अधिक दृढ केली आहे.

महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळामार्फत दरवर्षी विविध निकषांच्या आधारे राज्यातील संलग्न तंत्रशिक्षण संस्थांचे मूल्यमापन केले जाते. यामध्ये अध्यापनाची गुणवत्ता, अनुभवी व गुणवत्तापूर्ण प्राध्यापक वर्ग, अत्याधुनिक प्रयोगशाळा, समृद्ध ग्रंथालय, विद्यार्थी विकास उपक्रम, शैक्षणिक निकाल, विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध सुविधा, संस्थेची शैक्षणिक कार्यपद्धती आणि एकूणच शैक्षणिक वातावरण अशा विविध बाबींचे सखोल परीक्षण करण्यात येते.

या सर्व निकषांमध्ये उल्लेखनीय कामगिरी केल्याबद्दल कृष्णा कॉलेज ऑफ फार्मसीला यंदाही एक्सलंट ही सर्वोच्च श्रेणी प्राप्त झाली आहे. या मानांकनामुळे महाविद्यालयाच्या गुणवत्ता, शैक्षणिक उत्कृष्टता आणि विद्यार्थीकेंद्रित कार्यपद्धतीवर पुन्हा एकदा शिक्कामोर्तब झाले आहे.

कृष्णा कॉलेज ऑफ फार्मसीची स्थापना सन २००६ मध्ये डी. फार्म अभ्यासक्रमासह झाली. त्यानंतर औषधनिर्माणशास्त्रातील बी. फार्म पदवी अभ्यासक्रमदेखील सुरू करण्यात आला. या उल्लेखनीय यशाबद्दल संस्थेचे चेअरमन डॉ. सुरेश भोसले यांनी प्राचार्या डॉ. शुभांगी पाटील यांच्यासह शिक्षक, कर्मचार, विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.

# मलकापूरच्या आनंदराव चव्हाण विद्यालयात गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

**मलकापूर (हॅलो न्यूज)**

येथील आनंदराव चव्हाण विद्यालय व आदर्श जुनिअर कॉलेज, मलकापूर येथे गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ मोठ्या उत्साहात संपन्न झाला. शैक्षणिक वर्ष २०२५- २६ मध्ये इयत्ता दहावी मधील प्रथम पाच गुणवंत विद्यार्थ्यांचा व त्यांच्या पालकांचा गुणगौरव सत्कार समारंभ आयोजित करण्यात आलेला होता. तसेच स्पर्धा परीक्षांमध्ये एन.एम.एम. एस, शिष्यवृत्ती (इयत्ता पाचवी व आठवी) मधील यश मिळवलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचाही सत्कार त्यांच्या पालकांसमवेत करण्यात आला.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी वरिष्ठ पोलीस निरीक्षक दत्तात्रय दराडे होते. कोळे येथील प्राथमिक आरोग्य केंद्राचे डॉ.



प्रकाश कदम व सहाय्यक पोलीस निरीक्षक श्रद्धा आमले उपस्थित होत्या. यावेळी श्री मळाई देवी शिक्षण संस्थेचे सचिव अशोकराव थोरात, उद्योजक गुणवंतराव जाधव, शिवाजीराव धुमाळ, भास्करराव मोहिते, मधुकरराव जाधव, रामचंद्र येडगे, जयवंतराव कराळे, दमयंती कराळे, संजय तडाके, सुजाता भावके, शेखर शिर्के, अनिल शिर्के, तुळशीराम शिर्के तसेच गुणवंत विद्यार्थ्यांचे पालक उपस्थित होते.

# नीट पेपरफुटीप्रकरणी कराडात धरणे आंदोलन

## शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी

**कराड (हॅलो न्यूज)**

नीट परीक्षा पेपरफुटी प्रकरणी केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी नैतिक जबाबदारी स्वीकारून तातडीने राजीनामा द्यावा, या मागणीसाठी देशभर सुरू असलेल्या आंदोलनाला कराडमध्येही प्रतिसाद मिळाला. पंचायत समिती सदस्य संग्राम पवार यांच्या नेतृत्वाखाली शहरात एकदिवसीय धरणे आंदोलन करण्यात आले.

यावेळी आंदोलकांनी केंद्र सरकारविरोधात घोषणाबाजी करत नीट परीक्षा प्रक्रियेत झालेल्या कथित गैरव्यवहाराचा तीव्र निषेध व्यक्त केला. विद्यार्थ्यांच्या भविष्याशी खेळ करणाऱ्या पेपरफुटीसारख्या गंभीर प्रकारामुळे लाखो विद्यार्थ्यांमध्ये आणि पालकांमध्ये अस्वस्थतेचे वातावरण निर्माण झाले असून, या प्रकरणातील दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली.

आंदोलनकर्त्यांनी सांगितले की, नीटसारख्या राष्ट्रीय स्तरावरील परीक्षेची विश्वासार्हता अबाधित ठेवणे ही केंद्र




सरकारची जबाबदारी आहे. मात्र, वारंवार घडणाऱ्या पेपरफुटीच्या घटनांमुळे विद्यार्थ्यांचा परीक्षाव्यवस्थेवरील विश्वास डळमळीत झाला आहे. त्यामुळे केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी नैतिक जबाबदारी स्वीकारून पदाचा राजीनामा द्यावा, अशी मागणी यावेळी करण्यात आली.

या आंदोलनाला विविध राष्ट्रीय तसेच प्रादेशिक पक्षांनी आणि वंचित बहुजन आघाडीच्या आंदोलनालाही पाठिंबा दिल्याचे आंदोलकांनी सांगितले.

धरणे आंदोलनात सचिन पाटील, प्रताप भनगे, अभिजित चवरे, दिग्विजय थोरात, संतोष पवार, स्वप्नील गायकवाड, देवदास माने, सुरेश पाटील, शरद गाडे, विद्याधर गायकवाड, इंद्रजित पाटील, धीरज जाधव, अमोल जाधव, अक्षय सुर्वे यांच्यासह अनेक कार्यकर्ते सहभागी झाले होते. आंदोलन शांततेत पार पडले.



# 'कृष्णा'च्या महिला सभासद शेतकरी गिरवणार अत्याधुनिक ऊस शेतीचे धडे

## व्ही.एस.आयच ऊस शेती ज्ञानलक्ष्मी प्रशिक्षण शिबीर

**कराड (हॅलो न्यूज)**

वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूटच्यावतीने ऊस शेती ज्ञानलक्ष्मी प्रशिक्षण शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे. चार दिवसीय शिबीरासाठी यशवंतराव मोहिते कृष्णा सहकारी साखर कारखान्याच्या १६ महिला सभासद शेतकरी रवाना झाल्या असून, त्यांना अत्याधुनिक ऊसशेतीचे धडे गिरविण्याची संधी मिळणार आहे.

वसंतदादा शुगर इन्स्टिट्युटतर्फे शेतकऱ्यांना दरवर्षी ऊसशेतीच्या आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून, ऊसाच्या प्रतिएकरी उत्पादनवाढीसाठी प्रशिक्षण दिले जाते. कृष्णा कारखान्याचे चेअरमन डॉ. सुरेश भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली संचालक मंडळाने कार्यक्षेत्रातील १६ महिला सभासद शेतकऱ्यांना या शिबीरात सहभागी होण्याची संधी उपलब्ध करून दिली आहे. शिबीरासाठी रवाना होणाऱ्या महिला शेतकऱ्यांना व्हाईस चेअरमन जे.डी.मोरे, संचालक बाजीराव निकम, बाळासाहेब जगताप, अरविंद पाटील, मॅनेजिंग डायरेक्टर बाजीराव सुतार यांनी शुभेच्छा दिल्या.

# वसंतगडावर वृक्षाचा वाढदिवस साजरा

**कराड (हॅलो न्यूज)**

वसंतगड किल्ल्यावर रविवारी वृक्षाचा वाढदिवस उत्साहात पार पडला. टीम वसंतगड दुर्ग सेवक, वसंतगड व तळबीड ग्रामस्थ यांच्या पुढाकारातून तब्बल नऊ वर्षांपूर्वी २०१७ मध्ये लावलेल्या वृक्षाचा नववा वाढदिवस उत्साहात साजरा करण्यात आला.

वसंतगड, ता. कराड येथे या अनोख्या पार पडलेल्या सोहळ्यास ज्येष्ठ सिनेअभिनेते व निसर्गप्रेमी सयाजी शिंदे यांची प्रमुख उपस्थिती लाभली. तर कराडच्या पोलिस उपाधीक्षक राजश्री पाटील, मोटार वाहन निरीक्षक चैतन्य कणसे, अभिनेते वासू पाटील, नायब तहसीलदार युवराज पाटील, रामभाऊ बाबर, विशाल पाटील, तात्यासाहेब पाटील, शिवराय ट्रेकर्स, सदाशिव मावळा प्रतिष्ठान, कोयना काठ ट्रेकिंग ग्रुप, शिवप्रतिष्ठानचे कार्यकर्ते, दुर्गप्रेमी आणि पर्यावरणप्रेमींची उपस्थिती होती.

गायत्री मंत्राच्या मंगलमय वातावरणात



वृक्षपूजन करून कार्यक्रमाची सुरुवात झाली. उपस्थितांनी वृक्षसंवर्धनाची सामूहिक शपथ घेतली. वाढते प्रदूषण, बदलते हवामान आणि घटते वनक्षेत्र लक्षात घेता प्रत्येकाने किमान एक झाड लावून ते जगविण्याचा संकल्प करण्याचे आवाहन करण्यात आले.

यावेळी कार्यक्रमादरम्यान, वसंतगडावर ५०० करवंदांची रोपे लावण्यात आली. बाळासाहेब पाटील यांच्या माध्यमातून पिंपळ, लिंब आदी २०० देशी वृक्षांची लागवड करण्यात आली. ताकारीचे ऋषीकेश जाधव यांनी सीडबॉल उपलब्ध करून दिले, तर नागपूरचे उपजिल्हाधिकारी विजय पवार यांनी लाल करवंदाची रोपे भेट दिली. वसंतगड परिसरात मोठ्या प्रमाणावर देशी फळझाडांच्या सीडबॉलचे प्रक्षेपणही करण्यात आले.




# किरपे येथे मोटार सुरु करताना शॉक लागून शेतकऱ्याचा मृत्यू

**कराड (हॅलो न्यूज)**

शेताला पाणी देण्यासाठी विद्युत मोटार सुरु करण्यासाठी गेलेल्या शेतकऱ्याचा शॉक लागून जागीच मृत्यू झाला. ही घटना किरपे, ता. कराड येथे मंगळवारी घडली.

बाळासाहेब पंढरीनाथ देवकर (वय ५२, रा. किरपे, ता. कराड) असे शॉक लागून मृत्यू पावलेल्या शेतकऱ्याचे नाव आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी की, किरपे, ता. कराड येथील वांग नदीच्या काठावर बेली नावाच्या शिवारात असलेल्या शेतास बाळासाहेब देवकर हे मंगळवारी दुपारी चार वाजण्याच्या सुमारास पाणी देण्यासाठी गेले होते. तेथे विद्युत मोटार सुरु करताना त्यांचा मोटारीला हात लागला असता त्यातून सुरु असलेल्या वीज प्रवाहाचा धक्का त्यांना लागला. यावेळी विजेच्या धक्क्याने त्यांचा जागीच मृत्यू झाला.

दरम्यान, त्या परिसरातील शेतकऱ्यांनी हा प्रकार पाहिल्यानंतर त्यांनी पोलिसांना याबाबत माहिती दिली. पोलिसांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेतली. उपस्थितीत घटनास्थळाचा पंचनामा करण्यात आला. त्यानंतर मृतदेह शव विच्छेदनासाठी कराडच्या वेणूताई चव्हाण उपजिल्हा रुग्णालयात पाठवण्यात आला. या घटनेची नोंद रात्री उशिरा कराड तालुका पोलिसात झाली असून पुढील तपास सुरू आहे.

# मराठा लाईट इन्फंट्रीच्या अधिकाऱ्यांकडून सरसेनापती हंबीरराव बाजी मोहिते यांच्या समाधीस्थळी मानवंदना

**कराड (हॅलो न्यूज)**

स्वराज्यासाठी रणांगण गाजवणारे पराक्रमी सरसेनापती हंबीरराव बाजी मोहिते यांच्या स्मृतींना मंगळवारी भारतीय लष्कराच्या जवानांकडून मानाचा मुजरा करण्यात आला. मराठा लाईट इन्फंट्री सेंटर, बेळगाव येथील नऊ लष्करी अधिकाऱ्यांनी कराड तालुक्यातील तळबीड येथील हंबीरराव बाजी मोहिते यांच्या समाधीस्थळी भेट देत सैनिकी शिस्तीत मानवंदना अर्पण केली. या प्रेरणादायी क्षणाने उपस्थितांमध्ये राष्ट्रभक्ती आणि स्वराज्याचा अभिमान जागवला.

समाधीस्थळी पोहोचलेल्या अधिकाऱ्यांनी प्रथम पुष्पचक्र अर्पण करून सरसेनापती हंबीरराव मोहिते यांच्या अद्वितीय शौर्याला आदरांजली वाहिली. त्यानंतर सैनिकी पद्धतीने मानवंदना देत स्वराज्याच्या महान योद्ध्याप्रती



कृतज्ञता व्यक्त केली. छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्याचे रक्षण करण्यासाठी प्राणांची पर्वा न करता लढणाऱ्या हंबीरराव मोहिते यांच्या पराक्रमाचा इतिहास यावेळी उपस्थितांना पुन्हा एकदा स्मरण झाला.

याप्रसंगी माजी सैनिक विष्णू दुर्गवळे (तात्या) आणि गणेश शिवदास, जेष्ठ नागरिक जयाजीराव बाजी मोहिते उपस्थित होते. यावेळी जयाजीराव बाजी मोहिते यांनी लष्करी अधिकाऱ्यांचे स्वागत करून सरसेनापती हंबीरराव मोहिते यांच्या ऐतिहासिक कार्याचा परिचय करून दिला.

# डॉ. संग्राम धुमाळ यांच्या स्वागत समारंभास प्रतिसाद

**कराड (हॅलो न्यूज)**

यशवंतराव चव्हाण शासकीय कृषी महाविद्यालय, कराड येथील सहयोगी अधिष्ठाता तथा प्राचार्य पदी डॉ. संग्राम धुमाळ यांची नियुक्ती झाल्याबद्दल कराड तालुक्यातील यशवंतप्रेमी शेतकरी व महाविद्यालयाचा शेतकरी-शास्त्रज्ञ मंच यांच्या वतीने हॉटेल विट्स सत्यजीत, कराड येथे त्यांचे भव्य स्वागत व सत्कार समारंभ उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. या समारंभास मा. श्री. नामदेव काशिनाथ पाटील (जिल्हाध्यक्ष, सातारा जिल्हा काँग्रेस कमिटी), श्री. प्रकाश पाटील (अध्यक्ष, शेतकरी शास्त्रज्ञ मंच),, श्री. सचिन नलवडे (अध्यक्ष, रयत क्रांती संघटना), सौ. सुनंदा पाटील माई (जिल्हा परिषद सदस्या, सातारा), श्री. देवानंद पाटील (जिल्हाध्यक्ष, स्वाभिमानी शेतकरी संघटना), श्री. सतीशराव इंगवले (सभापती, शेती उत्पन्न बाजार समिती, कराड), श्री. सुनील पाटील (जिल्हाध्यक्ष, राष्ट्रवादी किसान सेल), श्री. आप्पासाहेब गायकवाड (सरचिटणीस, आरपीआय, सातारा) तसेच यशवंतराव चव्हाण शासकीय कृषी महाविद्यालय, कराडचे संस्थापक प्राचार्य तथा माजी सहयोगी अधिष्ठाता डॉ. शिवाजीराव पाटील यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या प्रारंभी उपस्थित मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. कार्यक्रमाच्या प्रास्ताविकेत बोलताना श्री. प्रकाश पाटील यांनी शेतकरी शास्त्रज्ञ मंचाच्या स्थापनेचा इतिहास, महाविद्यालयाची वाटचाल तसेच डॉ. संग्राम धुमाळ यांचे शैक्षणिक, संशोधन व प्रशासकीय



योगदान याबद्दल माहिती दिली. डॉ. धुमाळ यांच्या नेतृत्वाखाली महाविद्यालय सर्वांगीण प्रगती साधून नवे आदर्श निर्माण करेल, असा विश्वास श्री पाटील यांनी व्यक्त केला.

# लोकसहभागामुळे दक्षिण तांबवे शाळा जिल्ह्यात अग्रेसर : यशराज देसाई

**कराड (हॅलो न्यूज)**

जिल्हा परिषदेच्या शाळात आधुनिक तंत्रज्ञ देणे गरजेचे असून खासगी शाळाप्रमाणे सोयीसुविधा उपलब्ध होणे गरजेच आहे. स्मार्ट शाळा, स्मार्ट अंगणवाडी हा उपक्रम शासनाने राबविला असून त्यातून शाळांनी प्रगती साधली पाहिजे, त्यासाठी लोकसहभाग महत्वाचा असून तांबवे येथे शाळेसाठी मोठा लोकसहभाग असल्यानेच विद्यार्थी घडत आहेत. सातारा जिल्ह्यात गुणवत्तेत अग्रेसर असलेल्या दक्षिण तांबवे शाळेसाठी नविन इमारत ही ज्ञानमंदिर ठरेल, असा विश्वास लोकनेते बाळासाहेब देसाई सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन यशराज देसाई यांनी व्यक्त केला.

दक्षिण तांबवे (ता. कराड) येथील पालकमंत्री शंभूराज देसाई यांच्या प्रयत्नातून स्मार्ट शाळा अंतर्गत नव्याने बांधण्यात येणार असलेल्या चार शाळा खोल्याचे भूमिपूजन

## पालकमंत्री यांच्या माध्यमातून शाळेला नविन इमारत



चेअरमन यशराज देसाई यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी माजी जिल्हा परिषद सदस्य प्रदीप पाटील, सरपंच निता पवार, माजी सरपंच जयश्री कबाडे, उपसरपंच ॲड. विजयसिंह पाटील, युवा नेते विक्रम पाटील, बाजार समितीचे माजी सभापती प्रकाश पाटील, पंचायत समिती सदस्य दिनेश कुंभार, कोयना दूध संघाचे माजी चेअरमन लक्ष्मण देसाई, कोयना बँकेचे माजी संचालक अविनाश पाटील, संचालक तुकाराम डुबल, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष दिनेश मोगरे, मुख्याध्यापक आबासाहेब साठे, दिनकर बाबर, तात्यासाहेब पाटील, शरद चव्हाण, वसंत बाबर, संभाजी शिंदे, आनंदा शिंदे, जगन्नाथ शिंदे, ग्रामसेवक डी. डी. गायकवाड, वसंतगडचे माजी सरपंच संदीप सावंत, शिक्षिका मनिषा साठे, सीमा देसाई, शर्मिला पाटील, वैशाली माने आदी उपस्थित होते.

प्रदीप पाटील म्हणाले, तालुक्यात नव्हे तर जिल्ह्यात तांबवे गावचे नाव दक्षिण तांबवे शाळेच्या यशामुळे अधिकारी, पदाधिकारी घेतात. शाळेचे शिक्षक आणि व्यवस्थापन समिती अत्यंत चांगल्या पध्दतीने काम करत आहे. केवळ तांबवे नव्हे तर साकुर्डी, वसंतगड, उत्तर ताबंवे, गमेवाडी, आरेवाडी यासह अन्य गावातून स्कूल बसने दक्षिण तांबवे जिल्हा परिषदेच्या शाळेत विद्यार्थी येत आहेत. पालकमंत्री शंभूराज देसाई साहेब यांनी आमच्या शाळेच्या प्रगतीसाठी केलेली मदत ही पुढे गुणवत्ता व विद्यार्थी वाढीसाठी फायदेशीर ठरेल. सूत्रसंचलन संभाजी शिंदे यांनी केले. प्रास्ताविक मुख्याध्यापक आबासो साठे यांनी केले. तर विशाल पाटील यांनी आभार मानले.

### महेश पवार यांच्याकडून ११ हजारांची मदत

जिल्हा परिषद दक्षिण तांबवे शाळेच्या गुणवत्तेत वाढ होत असून पालकांची आर्थिक मदतही मोठ्या प्रमाणात मिळत आहे. शाळेच्या बांधकामासोबत अन्य सोयी सुविधा विद्यार्थ्यांना मिळाव्यात. यासाठी अनेक पालक सढळ हाताने मदत करत आहेत. शाळा भूमिपूजनाच्या निमित्ताने खारीचा वाटा म्हणून महेश पवार यांनी शाळेला ११ हजारांची मदत शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष दिनेश मोगरे व शिक्षकांकडे सुपूर्द केली.